# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 14.09.2026** **वार : सोमवार**

**गणेश प्रतिष्ठापना**

वरदविनायक गणेशाचं आज राज्यासह पुण्यात भक्तिमय वातावरणात आगमन झालं. पुण्यातल्या वैभवशाली गणेशोत्सवात अनुक्रमे कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या पाच मानाच्या गणपतींची पारंपरिक पद्धतीने सकाळच्या वेळात प्रतिष्ठापना करण्यात आली. सर्व गणेशांचे ढोल ताशांच्या गजरात आणि सनईच्या सुरात आगमन झाले. त्यानंतर पूजा, अभिषेक आणि आरती करून गणेशाची विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मुख्य मंदिरातून मयूर रथातून मिरवणूक काढत मंडपात आगमन झाले. यंदा या मंडळाने प्रेम मंदिराची भव्य प्रतिकृती साकारली आहे.

त्याशिवाय, अखिल मंडई मंडळाचा गणपती आणि पुण्याच्या गणेशोत्सवाची ऐतिहासिक परंपरा जपणारा श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाच्या गणरायाचीही मुहूर्तावर विधीवत प्रतिष्ठापना झाली. रंगारी गणपतीच्या मिरवणूकीत शंखनाद पथक आणि महिलांच्या मर्दानी खेळाचे पथक लक्षवेधक ठरले. एकंदरीत आकर्षक फुलांची सजावट असलेले रथ, पालख्या आणि शिस्तबद्ध ढोलताशांच्या पदकांचे वादन यामुळे आज मध्यवर्ती पुण्यात उत्साहाचं आणि जल्लोषाचं वातावरण होतं. घरगुती गणेशांचंही आज उत्साहात आगमन झालं. शहरात संध्याकाळीही काही सार्वजनिक मंडळांच्या गणरायाची प्रतिष्ठापना झाली.

आज गणेश आगमनाबरोबरच हरतालका तृतियाही होती. घरोघरी महिला वर्गाने हरतालकेची मनोभावे पूजा केली.

**गणेश मिरवणूक**

धनकवडी भागातील नऊ सार्वजनिक गणेश मंडळांनी संयुक्त मिरवणूक काढून गणेशोत्सवाची सुरुवात केली. गुलाबनगर ते मोहननगर मार्गावर कृत्रिम बुद्धिमत्ता-फायदे आणि भविष्य या संकल्पनेवर आधारित चित्ररथातून ही मिरवणूक निघाली.

**पुणे फेस्ट**

38व्या पुणे फेस्टिवलची आज गणेशाची प्रतिष्ठापना करून सुरुवात करण्यात आली. येरवडा कारागृहातील कैद्यांनी तयार केलेली श्री गणेशाची मूर्तीची स्थापना यंदा करण्यात आली आहे. पीएमआरडीएचे आयुक्त डॉक्टर अभिजीत चौधरी आणि डॉक्टर अनुश्री चौधरी यांच्या हस्ते बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

**पाणीपुरी गणेश**

पुण्यात एका खासगी आस्थापनेने 21 हजार पाणीपुऱ्यांचा 13 फूट उंच गणराय साकारला आहे. फर्गुसन रस्त्यावरील खासगी खाद्यगृहामध्ये हा गणेश पाहता येणार आहे. प्रशांत साळुंखे यांनी हा गणेश साकारला आहे.

**पोलिस बंदोबस्त**

दरम्यान, पुण्यातील गणेशोत्सव निर्विघ्न पार पडावा यासाठी शहरात सव्वा सात हजारांहून अधिक पोलिस अधिकारी आणि अंमलदारांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यासाठी सीसीटीव्ही, साध्या वेशातील पोलिस तसंच जलद प्रतिसाद दल, राज्य राखीव दलाची पथके नेमल्याची माहिती सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांनी दिली आहे.

**वाहतूक बदल**

मध्यवर्ती पुण्यात उद्या सकाळी वाहतुकीत बदल करण्यात येणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टकडून उद्या ऋषीपंचमी निमित्ताने अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं असून त्यामुळे मध्यवर्ती पुण्यातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा असं आवाहन पोलिस उपायुक्त डॉक्टर संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.

**अवजड वाहन-प्रवेशबंदी**

12 दिवसांच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख मार्गांवर अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. गणेश आगमन, गौरी पूजन आणि विसर्जनाच्या दिवशी ही बंदी चोवीस तासांसाठी असेल.

**मेट्रो**

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रोच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याबरोबरच मेट्रो सेवेचा कालावधी वाढविण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनानं दिली आहे. 14 ते 16 सप्टेंबरदरम्यान सकाळी 6 ते रात्री 11 या नियमित वेळेत मेट्रो सेवा सुरू राहणार आहे. त्यानंतर 17 ते 24 सप्टेंबरदरम्यान सकाळी 6 ते रात्री 2 वाजेपर्यंत मेट्रो धावणार आहे.

**कीटकजन्य आजार**

गणेशोत्सवाच्या कालवधीत कीटकजन्य आजारांचा प्रसार रोखण्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातील डेंगू, चिकुनगुनिया सारख्या कीटक प्रतिबंधक विभागाने विशेष उपाय योजना केल्या आहेत. त्यामध्ये विसर्जन हौद परिसरात औषध फवारणीसह नागरिकांमध्ये जनजागृतीचाही समावेश आहे.

**सेट परीक्षा बदल**

महाराष्ट्रा राज्यस्तरीय पात्रता परीक्षा म्हणजेच सेटच्या तारखेत पुन्हा बदल करण्यात आला आहे. ही परीक्षा आता 25 ऑक्टोबर रोजी होणार असल्याचं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाकडून प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत नमूद करण्यात आलं आहे. अधिक माहितीसाठी सेट विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**सहयोग पोर्टल**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विकासासाठी उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांच्यातील समन्वय वाढवण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या सहयोग पोर्टलचा काल शुभारंभ करण्यात आला. सामजिक उत्तरदायित्व निधीसाठी हे संकेतस्थळ तयार करण्यात आलं आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध प्रकल्पांची माहिती कंपन्यांना मिळू शकणार आहे.

**हवामान**

पुण्यात आज सकाळपासून आकाश थोडं ढगाळ राहिलं. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. शहरात कमाल तापमान 28 अंश तर किमान तापमान 21 पूर्णांक 8 दशांश अंश नोंदवलं गेलं. उद्याही आकाश अंशतः ढगाळ राहाण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**